महत्त्वाचे

गटकळ इंग्लिश मीडियम स्कूलचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

टाकळीभान (वार्ताहर)– श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील लेट श्री.एकनाथ नामदेव गटकळ इंग्लिश मीडियम स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेजच्या इयत्ता पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. नुकत्याच झालेल्या या शिष्यवृत्ती परीक्षेत इयत्ता पाचवी मधील गौरव शेंडे, समृद्धी बर्डे हे चांगल्या गुणांकाने उत्तीर्ण झाले. तर इयत्ता आठवीतील विद्यार्थी स्वरा बोरुडे, आरती बोडखे, श्रुतिका लोखंडे, हर्षद जगताप, रुद्र मेघळे, सपना रणनवरे यांनीही घवघवीत यश संपादन केले आहे. इयत्ता आठवीचा शंभर टक्के निकाल असून विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी श्री.गुजर, महेश शिंदे, श्रीमती .कोलते, श्रीमती. गायकवाड या शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे संस्थापक ॲड. भाऊसाहेब टेमक, प्राचार्या श्रीमती.टेमक व ग्रामस्थांनी यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करुन गुणगौरव केला.

कोपरे येथील जलजिवन मिशनचे काम तातडीने करण्याची मागणी

आरडगाव (वार्ताहर)– राहुरी तालुक्यातील कोपरे येथील महाराष्ट्र शासनाच्या जलजीवन मिशन अंतर्गत वाड्या वस्तीत जनवाहिन्यांचे काम तातडीने करा, अशी मागणी माजी उपसरपंच साहेबराव जगताप व ग्रामस्थांनी केली आहे. राहुरी तालुक्यातील कोपरे ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवक यांच्या आडमुठेपणामुळे अनेक कुटुंब हक्काच्या पाण्याच्या पाण्यापासून वंचित राहणार आहे. ठोसर वस्ती, नसीवाडी, बोरीफाटा, निलगिरी वस्ती, अदीवासी वस्ती अशा अनेक वस्तीत अध्याप जलवाहिन्यांचे कामे झालेली नाहीत. सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवक याबाबत उदासीन आहेत. तर झालेली कामेही अत्यंत निकृष्ट झालेली आहेत. कोपरे येथील लोकसंख्या जास्त प्रमाणात असताना पाण्याची टाकी इतर ठिकाणी सत्तेचा गैरवापर करून हलवण्यात आली आहे. स्थानिक राजकीय सुडापोटी कोपरे येथील वाड्या-वस्ता पाण्यापासून वंचित ठेवण्यात आल्या आहे. सदर काम न झाल्यास तीव्र स्वरूपात आंदोलन छेडले जाईल, असा इशारा माजी उपसरपंच साहेबराव जगताप, लक्ष्मण जगताप, भगीरथ जगताप, दिपक जगताप, बापूसाहेब जगताप, ओमचैतन्य जगताप, बबलू जगताप, एकनाथ ठोसर, संजय ठोसर, बापु ठोसर,अजित जगताप आदींनी दिला आहे.

जबरी चोरी प्रकरणातील दोघांना अटक तर एक अजूनही पसार

अकोले (प्रतिनिधी) – शहरातील परवानाधारक देशी दारु विक्रेत्या काशीबाई म्हतारबा डोंगरे व त्यांच्या मुलीस सोफा व खुर्चीला दोरीने बांधून तोंडाला चिकटटेप लावून चॉपर व पिस्तूल हातात घेऊन जीवे मारण्याची धमकी देत चौघांनी २ लाख २९ हजार रुपयांच्या मुद्देमालाच्या जबरी चोरी प्रकरणातील दोन आरोपींना छत्रपती संभाजीनगर येथून अकोले पोलिसांनी अटक केली आहे. तर अद्याप एक आरोपी पसार असून पोलीस त्याचा शोध घेत आहे. काशीबाई डोंगरे या परवानाधारक देशी दारु विक्रेत्या महिलेच्या घरी जबरी चोरी प्रकरणात सीसीटीव्ही फूटेज असतानाही तब्बल १३ दिवसांनंतर अकोले पोलिसांनी छत्रपती संभाजीनगर येथून ओंकार शेटे व निखील चौधरी यांना अटक केली आहे. तर यातील तिसरा आरोपी प्रभाकर वाकचौरे हा अद्याप फरार असून त्याचा पोलीस शोध घेत आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक विनोद खांडबहाले हे करत आहेत. या प्रकरणाची तालुक्यात उलटसुलट चर्चा सुरु असून या घटनेचा मुख्य सूत्रधार वेगळा असल्याचे बोलले जात आहे.

तालुक्याच्या संरक्षणाचे आमदारकीचे कवच जनतेने घालविले : थोरात

संगमनेर खुर्द येथे थोरात कारखान्याचा स्नेहसंवाद मेळावा

संगमनेर (प्रतिनिधी) – एकही दिवस विश्रांती न घेता सातत्याने चाळीस वर्षे काम केले. दुष्काळग्रस्तांसाठी धरण व कालवे पूर्ण केले. आपला तालुका, विविध सहकारी संस्था यांना आमदारकीचे संरक्षणाचे कवच होते. जातीधर्माच्या नावाखाली खोट्या भूलथापांमुळे हे कवच जनतेने घालवले असून तालुक्याच्या हक्काचे पाणी मिळवण्याबरोबर तालुका जपण्यासाठी संघटित होऊन संघर्ष करावा लागणार असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले.

संगमनेर खुर्द येथे सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या सभासद शेतकरी युवक व कार्यकर्त्यांच्या स्नेहसंवाद मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी बाबासाहेब ओहोळ, रणजीतसिंह देशमुख, इंद्रजीत थोरात, संपत डोंगरे, नवीन संचालक रामनाथ कुटे, नवनाथ अरगडे, विनोद हासे, विजय राहणे, विलास शिंदे, अंकुश ताजणे, दिलीप नागरे, राजेंद्र चकोर, संतोष मांडेकर, भाऊराव रहाणे, सरपंच गणेश शिंदे, मधुकर गुंजाळ, रमेश सुपेकर आदी उपस्थित होते.

माजी मंत्री थोरात पुढे म्हणाले, धर्माच्या नावावर विधानसभा निवडणुकीत जनतेला फसवले गेले. विधानसभेच्या निवडणुकीनंतर तालुक्याची बसवलेली घडी थोडी विस्कटली. सरळ विरोधक परवडले पण दोन्हीकडे राहणारे नको. आपला तालुका कुटुंब आहे. चुकीच्या पद्धतीने वागले तर त्याचा त्रास सर्वांना होतो. मागील ४० वर्षात एकही दिवस विश्रांती घेतली नाही. सातत्याने काम केले. धरण आणि कालवे आपणच पूर्ण केले. हक्काचे पाणी संगमनेर तालुक्याला मिळालेच पाहिजे. तालुक्यातील कालव्यांना प्लास्टरचे काम सुरू झाले. आपली पहिली मागणी होती की अगोदर आमच्या तालुक्यातील शेतकऱ्यांचे बारे काढून द्या आणि मग प्लास्टर करा. हे पाणी सर्वांना मिळालेच पाहिजे. ते काम आता होत आहे. मात्र, आमदारकी हे सर्व तालुका व सहकारी संस्थांना मोठे कवच होते. मात्र जनतेने ते कवच गमावले आहे. त्याचा लगेच त्रास सुरू झाला आहे. शहराजवळील गावांना आश्वी अप्पर तहसील कार्यालयाला जोडण्याचा डाव आहे. तर शहरामध्ये अशांतता निर्माण झाली आहे अशी परिस्थिती यापूर्वी कधीही नव्हती. आपले सुसंस्कृत राजकारण व संस्कृती टिकवण्यासाठी आपल्यातील मतभेद विसरून तालुक्याच्या कुटुंबासाठी संघटित होऊन संघर्ष करावा लागणार आहे. सर्व सहकारी संस्थांचे काम चांगले असून तालुक्यातील सर्व जनता व विरोधकही मान्य करतात. विधानसभेत चूक झाली असेल, परंतु आता सहकारी संस्थांच्या बाबत होणार नाही. झालेल्या चुका दुरुस्त करून सर्वांनी एकजुटीने तालुक्याच्या विकासासाठी एकत्र यावे असे आवाहन त्यांनी केले. प्रास्ताविक सुभाष गुंजाळ यांनी केले तर रवी नेहे यांनी आभार मानले. यावेळी चंदनापुरी, आनंदवाडी, झोळे, संगमनेर खुर्द, खांडगाव, यशवंतनगर, निमज, सावरगाव तळ येथील सभासद शेतकरी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकऱ्यांचे पाईप कोणाच्या सांगण्यावरून फोडले?

- हक्काचे पाणी मिळत नसल्याने शेतकऱ्यांनी निळवंडेच्या कालव्यावर पाईप टाकले. हे पाईप अधिकाऱ्यांनी कुणाच्या सांगण्यावरून फोडले असा सवाल करताना मंत्री महोदय असा चुकीचा आदेश देतील असे मला वाटत नाही. मग हे पाईप फोडण्याचे धारिष्ट झाले कसे? कुणाच्या आदेशावरून पाईप फोडले? शेतकऱ्यांशी चर्चा चर्चा केली पाहिजे. खालच्या भागाचे शेतकरी सुद्धा आपलेच आहेत. परंतु समन्वय करून प्रश्न सोडवता येतो. पाणी मिळाले नाही तरी अनेक ग्रामपंचायतींना पाणीपट्टीच्या नोटीसा आलेल्या आहे. पहिले शेतात पाणी द्या मग पाणीपट्टी भरतो असे सांगताना प्रवरा नदीकाठच्या शेतकऱ्यांना १८ तास वीज मिळाली पाहिजे. मात्र आवर्तन चालू असताना पाच तास सुद्धा वीज मिळत नाही हे काय सुरू आहे? असे अनेक प्रश्न माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी उपस्थित केले.

चार-पाच नंबर साठवण तलाव जोडणी काम जलद गतीने पूर्ण करा : आ.आशुतोष काळे

कोपरगाव (प्रतिनिधी)– कोपरगाव शहरातील नागरिकांना नियमित पाणी मिळावे यासाठी सुरु असलेल्या चार व पाच नंबर साठवण तलाव जोडणीचे काम तातडीने पूर्ण करा, अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांना व ठेकेदारास दिल्या आहेत.

आ. काळे यांच्या प्रयत्नातून पाच नंबर साठवण तलावाची निर्मिती झाली. त्यामुळे कोपरगाव शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या एक ते चार साठवण तलावांचा भार हलका होवून नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. परंतु नागरीकांना नियमित व पूर्ववत पाणी पुरवठा कसा करता येईल यासाठी आ. आशुतोष काळे यांचा सातत्याने खटाटोप सुरु असून चार व पाच नंबर साठवण तलाव जोडण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामाचा आ. काळे यांनी नुकताच आढावा घेत माहिती घेतली.

पाच नंबर साठवण तलावाचे काम पूर्ण होत नाही तोपर्यंत आ. काळे साठवण तलावाच्या कामावर बारीक लक्ष ठेवून होते. त्यामुळे त्यांनी प्रत्यक्ष भेट देवून सुरु असलेल्या कामाबाबत माहिती घेत लवकरात लवकर काम करण्याच्या सूचना दिल्या आहेत. गुरुवारपासून गोदावरी कालव्यांना उन्हाळी आवर्तन सोडण्यात येणार आहे. त्यामुळे येणाऱ्या आवर्तनातून सर्वच्या सर्व एक ते पाच साठवण तलाव पूर्ण क्षमतेने भरून घेण्यासाठी सुरु असलेले काम लवकरात लवकर होणे गरजेचे आहे. जेणेकरून शहरातील नागरिकांना नियमित व पूर्ववत पाणी पुरवठा करण्यासाठी चार नंबर साठवण तलावातून पाच नंबर साठवण तलावात पाणी उचलणे सहज शक्य होणार आहे. त्यासाठी हे काम लवकर पूर्ण करा, अशा सूचना आ. काळे यांनी अधिकाऱ्यांना व ठेकेदारास दिल्या आहेत.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत गोर्डेवस्ती तालुक्यात प्रथम

राहाता (तालुका प्रतिनिधी)– जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्यावतीने देण्यात येणारा मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा पुरस्कार वितरण शुक्रवारी पंचायत समिती राहाता येथे अस्तगाव येथील गोर्डेवस्ती शाळेस प्रदान करण्यात आला.

राज्य शासनाने भौतिक सुविधांमध्ये अमुलाग्र बदल घडून यावा यासाठी मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमाचे आयोजन केले होते. जिल्हा परिषदेच्या शाळा व खासगी सर्व माध्यमांच्या शाळांचा सहभाग होता. राहाता तालुक्यातील अस्तगाव येथील निसर्गरम्य परिसरात असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोर्डेवस्ती या शाळेस तालुक्यात स्थानिक स्वराज्य संस्था गटातून प्रथम क्रमांकाचा पुरस्कार शालिनीताई विखे पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी गटविकास अधिकारी पंडित वाघेरे, गटशिक्षणाधिकारी राजेश पावसे, मुख्याधिकारी वैभव लोंढे, एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी गंभिरे, विस्तार अधिकारी विष्णू कांबळे, केंद्रप्रमुख जाधव, अस्तगावचे सरपंच सुनिल चोळके, बाजार समितीचे संचालक संतोष गोर्डे, निवास त्रिभुवन, मुख्याध्यापक ठकाजी खेमनर, मंगल भडांगे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शाम चोळके, दत्तात्रय गोर्डे, संगिता गोर्डे, सनी चोळके, दादासाहेब सापते, चंद्रभान मेचे, शामराव लांडे अंगणवाडी सेविका बेबीनंदा मेढेकर, संचिता चोळके आदींसह पालक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पद्मभूषण डॉ.विखे पाटील जयंती निमित्त उद्या वांबोरीत नेत्र शिबीर

उंबरे (वार्ताहर)– राहुरी तालुक्यातील वांबोरी येथे पद्मभुषण स्व. डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या ९३ व्या जयंती निमित्त ग्रामपंचायत वांबोरी व वरद नेत्रालय यांच्या सयुंक्त विद्यमाने उद्या सोमवार दि. ५ मे रोजी वांबोरी येथे मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती सरपंच किरण ससाणे यांनी दिली.

वांबोरी ग्रामपंचायतीच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. माजी जि.प सदस्या शशिकलाताई पाटील यांच्या उपस्थितीत ज्येष्ठ नेते ॲड. सुभाषराव पाटील यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन होणार आहे. शिबीर सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत चालणार आहे. गरजू रूग्णांनी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

राज्यपालांच्यावतीने दिला जाणारा उल्लेखनीय सेवा पुरस्कार
पोलीस पाटील ॲड. सयाराम बानकर यांना प्रदान

शनीशिंगणापूर (वार्ताहर)– शनीशिंगणापूरचे पोलीस पाटील ॲड. सयाराम बानकर यांना राज्यपालांच्या वतीने दिला जाणारा उल्लेखनीय सेवा पुरस्कार महाराष्ट्र दिनी जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

यावेळी जिल्हाधिकारी पंकज आशिया, जिल्हा पोलीस प्रमुख राकेश ओला, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर आदी मान्यवर उपस्थित होते. हा पुरस्कार राज्यातील पोलीस पाटलांचा सर्वोच्च पुरस्कार मानला जातो. प्रशस्तीपत्रक, स्मृतीचिन्ह व रोख २५ हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

वितरण प्रसंगी गणेशवाडीचे सरपंच कैलास दरंदले, पोलीस पाटील संघटनेचे नेवासा तालुका अध्यक्ष रमेश डोळे, संजय दहिफळे, आसाराम कोरडे, प्रसाद दहिफळे, सुरेश बानकर, भाऊसाहेब बानकर, कचरू जंगले, बाळासाहेब बानकर, रामभाऊ जगताप, बापुसाहेब निबे आदी मान्यवर उपस्थित होते. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल ॲड. बानकर यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांची कोंढवड आदर्श शाळेला सदिच्छा भेट

राहुरी (प्रतिनिधी)– माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी राहुरी तालुक्यातील कोंढवड येथील जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श शाळेला सदिच्छा भेट देऊन त्यांनी दिलेल्या सीएसआर फंडातून उभारलेल्या अत्याधुनिक प्रयोगशाळेची पाहणी केली.

माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी कोंढवड ग्रामस्थांच्या मागणीनुसार कोंढवड येथील जिल्हा परिषद आदर्श शाळेला सीएसआर फंडातून अत्याधुनिक प्रयोग शाळेसाठी निधी उपलब्ध करून दिला. सदर प्रयोग शाळेचे काम पुर्ण झाल्यानंतर काल शुक्रवार दि. २ मे रोजी तनपुरे यांनी शाळेस सदिच्छा भेट देऊन प्रयोग शाळेची पाहणी करून विद्यार्थी व शिक्षकांशी संवाद साधून माहिती जाणून घेतली. लोकसहभागातून तयार झालेल्या आटीसी लॅबचीही त्यांनी पाहणी करून शिक्षक व ग्रामस्थांचे कौतुक केले. प्रयोग शाळेतील अत्याधुनिक उपकरणे व प्रयोगांची पाहणी करून त्यांनी समाधान व्यक्त केले. यापुर्वीही माजी मंत्री तनपुरे यांनी या आदर्श शाळेला दोन इंटरेक्टिव्ह बोर्ड दिले आहेत. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी त्याचा चांगला फायदा झाला आहे.

यावेळी नर्सिंग होमचे माजी अध्यक्ष उत्तमराव म्हसे, माजी सरपंच साहेबराव म्हसे, राहुल म्हसे, शाळा व्यवस्थापनचे अध्यक्ष दिपक म्हसे, भागवत म्हसे, बजरंग म्हसे, विष्णू म्हसे, विजय टापरे, उध्दव दुसुंग, अदिनाथ कराळे, मुख्याध्यापक भास्कर बुलाखे, दिलीप वर्पे, शिवाजी कुलट, भागवत पुंड, बाळकृष्ण देवरे, सोनाली सोलाट, ज्योती म्हसे आदी उपस्थित होते.

चेंगराचेंगरीत ७ भाविकांचा मृत्यू

पणजी (प्रतिनिधी)– गोव्यातील शिरगाव येथे शुक्रवारी रात्री श्री लैराई यात्रेदरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत सात जणांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेत ५० हून अधिक लोक जखमी झाले आहेत, त्यापैकी २० जणांची प्रकृती गंभीर आहे. मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. मृतांचा आकडा वाढू शकतो. शुक्रवारी संध्याकाळी मोठ्या संख्येने भाविक जत्रेत सहभागी होण्यासाठी मंदिराकडे जात होते. दरम्यान, दुकानासमोरील विजेच्या तारेचा धक्का लागून काही लोक खाली पडले. मग गोंधळ उडाला आणि चेंगराचेंगरी झाली. गर्दी व्यवस्थापनाच्या पुरेशा व्यवस्थेअभावी ही दुर्घटना घडली. मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत.